आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१५ जून २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- इटलीचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आज नवी दिल्लीत आगमन

- शेतकरी सन्मान निधी योजने अंतर्गंत येत्या १८ जूनला नऊ कोटी तीन लाख शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे २० हजार कोटी रुपये जमा होणार

- उच्चशिक्षण संस्थांमधला प्रवेश तीस सप्टेंबरपर्यंत रद्द केल्यास विद्यार्थ्यांना शुल्काचा पूर्ण परतावा

- देशाचा परकीय चलन साठा ७ जूनला संपलेल्या आठवड्यात ६५५ अब्ज ८१ कोटी ७० लाख डॉलर्सच्या विक्रमी पातळीवर

- महाराष्ट्रात पंढरपूरच्या आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या दिंड्याना वीस हजार रुपयांचं अनुदान देण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

**आणि**

- टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना कॅनडा बरोबर

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी इटलीचा दौरा आटोपून आज नवी दिल्लीला परतले. हा दौरा अतिशय फलदायी झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. या दौऱ्यात जागतिक नेत्यांशी विविध विषयांवर चर्चा झाली, असं त्यांनी सांगितलं. जागतिक समुदायाला लाभदायक ठरतील अशा प्रभावी उपाययोजना आखण्यासह भावी पिढीसाठी एका उत्तम जगाची निर्मिती

करण्यासाठी सर्वांनी वचनबद्धता दर्शवली, असंही ते म्हणाले. विकसनशील देशांबाबतच्या, विशेषतः आफ्रिकेच्या मुद्द्यांना प्राधान्य देण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी काल जी सेव्हन परिषदेला संबोधित करताना केलं. उर्जा, कार्बन उत्सर्जन, पर्यावरण, कृत्रिम बुद्धिमत्ता अशा जागतिक महत्त्वाच्या विविध मुद्यांवर त्यांनी भारताची भूमिका मांडली. या परिषदेनिमित्त जमलेल्या इतर राष्ट्रप्रमुखांशी प्रधानमंत्र्यांनी या दौऱ्यात चर्चा केली. इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी, जपानचे प्रधानमंत्री फुमिओ किशिदा यांच्याबरोबरच संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँतोनिओ गुटेरस यांचीही मोदी यांनी भेट घेतली.

जी सेव्हन व्यासपीठावर महत्त्वाच्या जागतिक मुद्द्यांविषयी फलदायी संवाद झाला आणि शिखर परिषदेत सहभागी देशांसोबत भारताची भागीदारी अधिक दृढ झाली, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या१८ जूनला वाराणसी एका कार्यक्रमात प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेअंतर्गंत नऊ कोटी तीन लाख शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे २० हजार कोटी रुपये जमा करणार असल्याची माहिती केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज दिली. नवी दिल्लीत बातमीदारांशी ते बोलत होते. गेल्या दहा वर्षांत आतापर्यंत ११ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात तीन लाख कोटी रुपये हस्तांतरित केल्याचंही चौहान यांनी सांगितलं.

प्रधानमंत्री मोदींच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र पाठल्याचंही चौहान यांनी सांगितलं. कृषी मंत्रालयाचा पदभार स्वीकारल्यानंतर शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित असलेल्या सर्व मुद्द्यांवर काम करत असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

१८व्या लोकसभेचं अधिवेशन येत्या २४ जून पासून सुरु होत असून अधिवेशनात सर्व राजकीय पक्ष मिळून विधायक कामकाज करतील अशी आशा केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी व्यक्त केली आहे. संसदेची प्रतिष्ठा आणि सन्मान राखण्याच्या कामी सर्व सदस्य सहकार्य करतील अशी अपेक्षा त्यांनी समाजमाध्यमावर दिलेल्या संदेशात व्यक्त केली आहे. या अधिवेशनात सर्व नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी होईल. राज्यसभेचं अधिवेशन २७ जूनपासून सुरु होणार असून दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर राष्ट्रपतींचं अभिभाषण होईल. अधिवेशन येत्या ३ जुलै पर्यंत चालणार आहे.

**<><><><><>**

उच्चशिक्षण संस्थांमधला प्रवेश विद्यार्थ्यांनी तीस सप्टेंबरपर्यंत रद्द केल्यास किंवा अन्यत्र प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांना पूर्ण शुल्काचा परतावा देणं संबंधित संस्थेला बंधनकारक राहणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग - यूजीसीनं २०२४-२५ या वर्षासाठी शुल्क परतावा धोरण जाहीर केलं आहे. त्यात पूर्ण परताव्याची तरतूद नमूद करण्यात आली आहे. प्रवेश रद्द केल्यास पूर्ण शुल्क परत मिळत नसल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी केल्याच्या पार्श्वभूमीवर यूजीसीनं ही उपाययोजना केली आहे. केंद्र किंवा राज्य सरकारांच्या अखत्यारीतल्या उच्चशिक्षणसंस्था, आयोगाने मान्यता दिलेल्या संस्था, अभिमत विद्यापीठं या सगळ्यांना हे धोरण लागू होणार असल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे. तीस सप्टेंबरनंतर आणि ३१ ऑक्टोबरच्या आत प्रक्रिया शुल्क म्हणून एक हजार रुपयांपेक्षा कमी रक्कम कापून

परतावा देता येईल, तर ३१ ऑक्टोबरनंतर परताव्यासाठी ऑक्टोबर २०१८ चा आदेश लागू होईल, असं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

देशाच्या परकीय चलन साठ्यात ४ अब्ज ३० कोटी ७० लाख अमेरिकन डॉलर्सची वाढ झाली असून ७ जूनला संपलेल्या आठवड्यात तो ६५५ अब्ज ८१ कोटी ७० लाख डॉलर्सवर पोहोचला आहे. आतापर्यंत भारताकडच्या परकीय चलनाचा हा सर्वात जास्त साठा आहे. यापूर्वी सर्वाधिक साठा ६५१ अब्ज ५१ कोटी डॉलर्स इतका गेल्या १० मे रोजी होता.

**<><><><><>**

पंढरपूरच्या आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या दिंड्याना वीस हजार रुपयांचं अनुदान देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. पालखी सोहळ्याच्या नियोजनासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल मुंबईत झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

**<><><><><>**

पंढरपूर इथं यावर्षीपासून आषाढी एकादशीला श्री विठ्ठलासोबतच रुक्मिणीमातेची देखील शासकीय पूजा होणार आहे. आषाढी यात्रेत सहभागी होण्यासाठी रुक्मिणीमातेचं माहेर म्हणून ख्याती असलेल्या अमरावती मधल्या श्रीक्षेत्र कौंडण्यपूर इथून पालखीनं काल प्रस्थान केलं. ४३० वर्षांची परंपरा असलेल्या या पालखीला मानाची पालखी म्हणून महत्व आहे. या मंगल सोहळ्याकरता सर्वधर्मीय नागरीक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या बस्तर परिसरात सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत आज ८ माओवादी मारले गेले. अबुझमाडच्या जंगलात माओवादी सक्रीय असल्याची खबर मिळाल्यावरुन ITBP, जिल्हा राखीव पोलीस आणि विशेष कृती दलाच्या संयुक्त पथकानं शोधमोहिम सुरु केली होती. त्यादरम्यान ही चकमक झाली. शोधमोहिम अद्याप सुरु आहे. सुरक्षा दलाचे दोन जवानही चकमकीदरम्यान जखमी झाले.

**<><><><><>**

आयसीसी टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि कॅनडा संघांमध्ये सामना होणार आहे. हा सामना फ्लोरिडा इथल्या सेंट्रल ब्रॉवर्ड पार्क मैदानावर भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता सुरू होईल.

काल वेस्ट इंडिजच्या लॉडरहिलमध्ये दक्षिण आफ्रिका आणि नेपाळ यांच्यात चुरशीचा सामना झाला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं नेपाळवर अवघ्या एका धावेनं विजय मिळवला. तर अमेरिका आणि आयर्लंड यांच्यातला सामना पावसामुळे रद्द झाला. चांगल्या धावगतीच्या जोरावर अमेरिकेने सुपर आठमध्ये प्रवेश केला आहे. अमेरिकेच्या संघानं पदार्पणातच सुपर आठमध्ये प्रवेश करत विक्रम केला आहे. अ गटातून सुपर आठमध्ये भारत आणि अमेरिकेनं प्रवेश केला आहे तर पाकिस्तान आणि आयर्लंड हे स्पर्धेतून बाहेर पडले आहेत.

**<><><><><>**

१८व्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून सुरुवात होणार आहे. मुंबईतल्या नॅशनल सेंटर फॉर पर्फोर्मिंग आर्ट्स इथं होणाऱ्या या महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्याला माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील. तसंच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, तसंच मुंबई आंतरराष्ट्रीय महोत्सवाचे

संचालक आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे संयुक्त सचिव पृथुल कुमार या कार्यक्रमाला संबोधित करणार आहेत. तत्पूर्वी, महोत्सवाचा प्रारंभ बिली अँड मॉली- ॲन ऑटर लव्ह स्टोरी या माहितीपटानं होईल. यंदा मिफमध्ये ५९ देशांमधून ६१ भाषांमधले एकंदर ३१४ लघुपट, माहितीपट आणि ॲनिमेशनपट दाखवण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

कुवेतमध्ये आगीत मृत्युमुखी पडलेल्या ४५ भारतीयांचं पार्थिव काल हवाईदलाच्या विशेष विमानानं भारतात आणण्यात आले. हे विमान कोचीमध्ये आणि नंतर नवी दिल्लीमध्ये उतरवण्यात आलं. मृतांमधे मुंबईतले डेनी करुणाकरन यांचा समावेश होता. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या भारतीयांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपयांचं अर्थसहाय्य देण्याची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्रालय आणि भारतीय स्टेट बँकेत एक करार झाला असून त्या अंतर्गंत स्थलांतरीत भारतीय कामगार, भरती करणारे एजंट आणि ई-मायग्रेट पोर्टलच्या वापरकर्त्यांना अतिरीक्त डिजीटल पेमेंट सुविधा दिली जाणार आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे सहसचिव ब्रह्म कुमार आणि स्टेट बँकेचे महाव्यवस्थापक निलेश द्विवेदी यांनी  नवी दिल्लीत या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

**//<><><><><>//**